# ऑडीटर्स कौन्सिल ॲण्ड वेल्फेअर असोसिएशन

नोंदणी क्रमांक : एफ/५४९२४/पुणे दिनांक २९/१२/२०२० (कार्यक्षेत्र : महाराष्ट्र राज्य)

कार्यालयीन पत्ता - सर्व्हे नं. ७१, किर्तीनगर, नवी सांगवी, पुणे ४११ ०६१.
E-mail : acwapune@gmail.com, Website : https://www.mahaauditorscouncil.org/

प्रती,

**प्रमाणीत लेखापरीक्षक बंधु भगिनी,**

राज्यातील प्राथमिक सहकारी संस्था जसे कि पतसंस्था, विविध कार्यकारी संस्था, दुग्ध व्यवसाय करणाऱ्या संस्था, गृहनिर्माण सहकारी संस्था अशा संस्थांचे वैधानिक लेखापरीक्षण करण्याचे आपण गेली अनेक वर्षे करीत आहोत. सहकार खात्याने प्रसिध्द केलेल्या लेखापरीक्षक नामतालिकेवर आपण काम करीत असून आजमितीला आपली राज्यातील एकूण संख्या १३७९७ इतकी आहे, तर त्यातून आपली प्रमाणीत लेखापरीक्षक संख्या जवळपास ८५०० इतकी आहे. राज्यातील एकूण १९०००० इतक्या सहकारी संस्थांपैकी जवळपास ९० टक्के सहकारी संस्थांचे लेखापरीक्षणाचे काम आपल्याकडून होत आहे.

प्रमाणीत लेखापरीक्षक म्हणून आज इतकी वर्षे काम करीत असताना आपल्याला सेवाशाश्वती, सुरक्षितता, कायद्याचा आधार, उत्पन्नाची निश्चीती या कोणत्याही बाबी मिळत नाहीत. **सहकार कायद्यानुसार लोकसेवक** या व्याख्येत समाविष्ट असुनही आपणांस त्याचे कोणतेही अधिकृत संरक्षण उपलब्ध नाही. आपल्याला येणाऱ्या अनंत अडचणींचा सामना करण्याच्या उद्देशाने चार वर्षापूर्वी **ऑडीटर्स कौन्सिल ॲण्ड वेल्फेअर असोसिएशनची** स्थापना झाली. कौन्सिलने स्थापनेनंतर अतिशय कमी वेळात कामाचा वेग घेतानाच लेखापरीक्षकांसाठी विविध कामे केली आहेत. कोरोना कालावधीत महत्वाचा असणारा संपर्क व आपल्यासाठी आवश्यक असणारे प्रशिक्षण या बाबी लक्षात घेऊन आपण ऑनलाईन वेबिनार सुरू केले. **आजअखेर जवळपास ७८ वेबिनार घेतले असून अद्यापही ते सुरू** आहेत. या कार्यक्रमास आतापर्यंत सहकार मंत्री, सहकार आयुक्त यांचेपासून ते अनेक अभ्यासु व तज्ञ व्याख्यात्यांनी आपल्याला मार्गदर्शन केले आहे. एखाद्या लेखापरीक्षकावर होणाऱ्या अन्यायाच्या बाबतीत कौन्सिलने नेहमीच त्याला मार्गदर्शन व सहकार्याची भूमिका घेतली आहे. **राज्य पातळी तसेच विभाग व जिल्हा पातळीवर सभासद व पदाधिकारी असणारी कौन्सिल ही प्रमाणित लेखापरीक्षकांची एकमेव संघटना** आहे. राज्यातील सर्व सहकार विभाग व सर्व जिल्ह्यांत आपले सभासद आहेत. **कौन्सिलचे संघटनात्मक महत्व लक्षात घेऊन सहकार खात्यानेही आपल्याला वेळोवेळी महत्व दिले** आहे. आपल्या एक विश्वस्त प्रतिनिधीने सहकार खात्याच्या कायदा दुरूस्ती समितीवर काम केले, एकाची नियुक्ती विकास सेवा संस्था आदर्श लेखापरीक्षण अहवाल मसुदा समिती तसेच गुणपत्रक समितीवर तर आणखी एका प्रतिनिधीची नियुक्ती सेवक पतसंस्था गुणपत्रिका समितीवर झाली असून त्यांनी आपले काम उत्कृष्ट पध्दतीने केली आहेत.

आतापर्यंत **कराड तसेच देवगड येथे घेतलेल्या व उच्चांकी संख्येने उपस्थिती लाभलेल्या अधिवेशनांमुळे कौन्सिलचे महत्व अधोरेखित** झाले आहे. गेल्या वर्षी प्रसिध्द झालेली **कौन्सिलची डायरी हा एक संग्रही दस्तऐवज** बनला आहे. कौन्सिलची **स्वतःची वेबसाईटही** सुरू आहे.

आपल्याला येणाऱ्या अडचणींबाबत काही सहकार अधिकाऱ्यांची भुमिका सकारात्मक आहे. मात्र तरीही अपेक्षित कामे होताना दिसत नाहीत, म्हणून येत्या कालावधीत **कांही कामांसाठी उच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावण्याचे कामही कौन्सिल लवकरच करणार आहे.** आपण सर्वजण एकत्र असणे ही काळाची गरज आहे. संघटन शक्ती हि अशी एकमेव शक्ती आहे, कि ज्यामुळे कोणतेही काम अशक्य नाही हे आपल्याला ठामपणे माहीत आहेच. **संघटन शक्तीच्या जोरावर आपल्या मागण्या** मान्य करण्यासाठी आपल्यातील प्रत्येक प्रमाणीत लेखापरीक्षक कौन्सिलशी जोडला गेला पाहिजे. **एक हैं तो सेफ हैं** या उक्तीनुसार आपण सर्वजण एकत्र येऊया आपल्या सर्वांच्या हितसाठी काम करूया.

यासाठी आपणांस आवाहन करणेत येत आहे, कि सोबत दिलेल्या कौन्सिलच्या सभासद अर्जासह दिलेल्या बँक अकौंटवर आपली सभासद फी भरून या कार्यात सहभाग घ्यावा. सोबतच्या अर्जानुसार आजीव सभासद फी ५१०० इतकी असून वार्षिक वर्गणीदार फी ११०० इतकी आहे. जुन्या वर्गणीदार सभासदांनाही आणखी ४००० भरून आजीव सभासद होता येईल.

**लवकरच भेटू नाशिक येथील अधिवेशनात...**

**धन्यवाद...**

संपर्क क्र. : ____________________ पद : ____________________

**श्री. रामदास शिर्के** अध्यक्ष | **श्री. आबासाहेब देशमुख** उपाध्यक्ष | **श्री. उमेश देवकर** सचिव | **श्री. दत्तात्रय पवार** सहसचिव | **श्री. संदिप नगरकर** खजानीस

**श्री. बाळासाहेब वाघ** विश्वस्त | **श्री. श्रीकांत चौगुले** विश्वस्त | **श्री. संजय घोलप** विश्वस्त